बालगंधर्व रंगमंदिर, पुणे, येथे संपन्न झालेल्या २०१३ च्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन प्रसंगी संमेलनाध्यक्ष राजीव तांबे ह्यांचे अध्यक्षीय भाषण.

## शोधा, समजून घ्या आणि सांगा

ही तशी खूप जुनी गोष्ट असली तरी माझ्यासाठी खूप महत्त्वाची आहे.
आमच्या गावात एका रविवारी मुलांसाठी चित्रकला स्पर्धा होती. शेकडो मुलांनी स्पर्धेत भाग घेतला होता. त्या स्पर्धेच्या परीक्षकांपैकी एक जण न आल्याने अचानक तिथे माझी नेमणूक झाली. शाळेच्या वर्गात, व्हरांड्यात, मैदानात बसून चित्रं काढण्यात मुले रंगून गेली होती. मुलांची चित्रं पाहात मी मुलांमधून फिरू लागलो.

त्याच वेळी मला भेटली इयत्ता पहिलीतली प्रिया.

प्रियाचं चित्र पाहून तिला मदत करण्याची व सल्ला देण्याची अनिवार उबळ मला आली. तिने चित्रात संपूर्ण पानभर पसरलेलं हिरवं झाड काढलं होतं. त्या झाडाखाली काही मुले खेळत होती, काही खात होती तर काही लोळत वाचत होती. पण त्या सर्व मुलांचे कपडे, त्यांची खेळणी व त्यांची पुस्तकं पण प्रियाने हिरव्या रंगात रंगवली होती. आणि तिचं हे हिरवा रंग देण्याचं काम सुरूच होतं.

मी प्रियाच्या बाजूला मांडी घालून बसलो. आणि माझ्या आवाजाला उसन्या प्रेमाची झालर लावत तिला म्हणालो,“अगं तुला आणखी खडू हवेत का? वेगवेळ्या रंगात रंगव की, या मुलांचे कपडे, त्यांची खेळणी आणि पुस्तकं. बघ ना आजूबाजूला.. मुलांनी किती सुंदर रंगीबेरंगी कपडे घातले आहेत ना? का..य? हा घे रंगीत खडूंचा नवीन बॉक्स.”

माझ्या या चमकदार बोलण्याने आणि मी देत असलेल्या नवीन बॉक्सने ती भारावून जाईल असं मला वाटलं होतं. पण मी ज्या हातात बॉक्स धरला होता तो बाजूला सारत ती वज्रासनात बसल्यासारखी बसली.

तिने दोन हातात चित्रं घेऊन ते मला दाखवलं. एकदा त्या अपूर्ण चित्राकडे व एकदा माझ्याकडे पाहात ती हळूच हसली व म्हणाली,“काका, तुम्हाला या चित्रातली सावली दिसली नाही ना?”

मी मनापासून माझी हार कबूल करत मान डोलावली.

मला समजावत प्रिया म्हणाली,“काका, या मुलांच्या कपड्यावर, त्यांच्या खेळण्यांवर आणि सर्वांवरच या हिरव्या झाडाची सावली पडली आहे.. हिरवीगार सावली! पाहा नं नीट..?”

तिच्या नजरेतून त्या चित्राकडे पाहताना मी अवाक झालो.

‘मोठ्यांच्या विश्वात झाडांच्या सावल्या काळ्या पडतात, म्हणून मोठ्या माणसांना झाडाच्या सावलीत गेलं की थंडगार वाटतं. पण मुलांच्या विश्वात झाडांच्या सावल्या हिरव्या पडतात. त्यामुळे झाडाखाली गेल्यावर हिरवंगार तर वाटतंच पण त्यांचं अवघं विश्वही हिरवंगार होतं!!’

मुलांच्या अभीव्यक्तीकडे पाहण्याची एक नवी दृष्टीच मला प्रियाने दिली होती. “मुलांची अभिव्यक्ती ही आपल्याला समजेल अशीच असली पाहिजे असं नाही तर ती आपण मुलांकडून समजून घेतली पाहिजे.”

“तुम्ही तुमचं मोठेपण आणि पूर्वग्रह बाजूला भिरकावून दिले आहेत, याची जेव्हा खात्री मुलांन पटते तेव्हाच ती तुमच्याशी दोस्ती करतात आणि त्यांच्या कृतीमागील कार्यकारणभाव तुम्हाला समजावा यासाठी त्यांच्या भावविश्वात तुम्हाला सामावून घेतात.”

मुलांसाठी लिहिताना आणि मुलांसोबत काम करताना ही गोष्ट मला सतत सावध करत असते.

बालसाहित्याबाबत भूतकाळाचा तपशीलवार आढावा न घेता वर्तमानात राहून भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न मी इथे करणार आहे.

बालसाहित्याचे किंवा साहित्याचे नेमके प्रयोजन काय? मुलांना शिकवणं, उपदेश करणं, तात्पर्य सांगणं, संस्कार करणं किंवा त्यांना घडवणं हे तर नव्हे आणि नव्हेच. बालसाहित्याचं प्रयोजन आहे, मुलांना दृष्टी देणं आणि मुलांना आनंद देत त्यांच्या विविध संकल्पनांबाबतच्या कक्षा रुंदावत नेणं. बालसाहित्य हे मुलांना शिकवत नाही तर शिकण्याच्या अनेकानेक पध्दती, विविध पर्याय मुलांसमोर सहजी उलगडून ठेवतं आणि मुलाला त्याच्यातील सूप्त शक्ती व सर्जनशीलता यांची जाणीव करून देतं. कारण बालसाहित्याचा पाया हा 'मुलांना गृहित धरणे' हा नसून 'मुलांवरचा अपार विश्वास आणि मुलांवर निरपेक्ष प्रेम' हा आहे.

मुलांना जसे वेगवेगळे साहित्य प्रकार वाचायला मिळायला हवेत तसंच वेगवेगळे प्रकार लिहायला ही मिळायला हवेत. शाळेत मुलांना खूपंच चाकोरीबद्ध लेखन करावं लागतं. ठरलेल्या पध्दतीनेच निबंध लिहिणे. विशीष्टप्रकारेच कवीतेचे रसग्रहण करणे किंवा टीपा लिहिणे. काहीवेळा तो त्या सिस्टीमचा एक भाग ही असतो. पण सततची चाकोरी ही सर्जनशीलतेला मारक ठरते. मग कोवळ्या वयातच मुलांची सर्जनशीलता ठेचली जाते आणि त्यांचे शिस्तबद्ध सैनिकांत रुपांतर होते.

प्रत्येक शाळेत महिन्यातून किमान दोन तासीका जरी 'मुलांच्या सर्जनशील उपक्रमांसाठी' राखून ठेवल्या तरी खूप फरक पडू शकेल. यावेळी मुलांना पुस्तकाबाहेरचं शिकणं निर्भयपणे अनुभवता आलं पाहिजे. 'निर्भयपणे' म्हणजे या तासिकांच्यावेळी मुलांना "नाही" म्हणण्याचे स्वातंत्र्य ही असावे. या दोन तासिकांच्यावेळी मुले त्यांना जे पाहिजे ते लिहितील, वाचतील, चित्र काढतिल किंवा आपापसात गप्पा ही मारतील. पण या तासिकांचा अभ्यसक्रम मात्र तयार करायचा नाही.

याबाबतीत आमच्या गंमतशाळेतला अनुभव अतिशय बोलका आहे. 'पावसाळ्यतला पहिला दिवस' हा निबंध आमच्या शाळेतली मुले लिहित नाहीत. 'पावसाळा' आम्ही तीन भागात विभागला आहे. गावातला पावसाळा, शहरातला पावसाळा व झोपडपट्टीतला पावसाळा. पाऊस पडल्यावर या तीनही ठिकाणी 'धरणीमाता काही हिरवा शालू पांघरुन बसत नाही' तर इथे वेगवगेळ्या आणि परस्पर भीन्न घटना घडतात. वर्गातील मुलांचे तीन गट तयार करून मुलांनी त्या-त्या भागातील माहिती गोळा केली. काही मुलांनी मिळून लिहिलं तर काहींनी स्वतंत्रपणे.

वस्तीत राहणाऱ्या एका मुलीने आपल्या निबंधात लिहिले,"आमच्या घराच्याच बाजूला गॅरेज आहे. पावसाळ्यात डांबरी रस्त्यावर डिझेल पडलं की तिथे गोल इंद्रधनुष्य तयार होतं. मी काठीने ती एकमेकांना जोडते आणि इंद्रधनुष्यांची रंगीत माळ तयार करते." इतका सुंदर विचार केवळ मुलंच मांडू शकतात. मुलांवरचं चाकोरीबध्द लेखनाचं दडपण कमी केलं की मुलां मधील सूप्त सर्जनशीलता अशी उसळी घेते.

प्रत्येक वर्गाची भित्ती-पत्रिका (वॉल पेपर) जरी सुरू केली तरी त्यावर मुलांना त्यांच्या आवडीचं त्यांच्या पध्दतीने लिहिता येईल. जेव्हा मुले लेखनाच्या वेगवेगळ्य प्रकारातून स्वत:ला व्यक्त करू लागतील किंवा आपल्या मनातील विचार आपल्याच भाषेत मांडण्यासाठी वेगळे प्रकार शोधू लगतील तेव्हा सहाजिकच मुले साहित्यातील विविध प्रकार वाचण्यासठी उद्युक्त होतील.

पण आज मुलं खरंच काही वाचतात? आणि जर मुले वाचत नसतील तर याला जवाबदार कोण? पण न वाचण्यासाठी सर्वस्वी मुलांनाच जवाबदार ठरवणं अन्याकारकच होईल. मुलांचं वाचन आणि त्याचे शिकण्याचे माध्यम यांचा जवळचा संबंध आहे. मातृभाषा आणि परीसर भाषा एकंच असेल आणि मुलाचे शिकण्याचे माध्यम ही तीच भाषा असेल तर त्या मुलांचे वाचन अधिक असते. घरात आणि समाजात तो ती भाषा सतत ऐकत असतो आणि चुकांची पर्वा न करता तो बोलत ही असतो.. नवनवीन संकल्पना समजून घेत असताना त्याची शब्दसंख्या वाढत

जाते. जसजशी शब्दसंख्या वाढते तसा त्याचा आत्मविश्वास दुणावतो. त्याची विचार करण्याची भाषा आणि त्याची अभीव्यक्तीची भाषा यांचा घट्ट समन्वय साधला जातो. यामुळेच त्याला जे म्हणायचं आहे ते तो त्याच्या भाषेत, त्याच्या शब्दात बिनचूकपणे मांडू लागतो. आणि नेमक्या याच क्षणी जर त्याच्या हाती पुस्तकं आली तर तो उत्तुंग भरारी घेतोच.

पण इथे ग्यानबाची मेख आहे त्या 'जर' आणि 'तर' मधे.

इंग्रजी माध्यमात प्रवेश घेतल्यावर 'न वाचनाचा' पहिला धोंडा पायावर पडण्याची शक्यता निर्माण होते. कारण इथे शाळेत फक्तं इंग्रजी 'ऐकायचं' आहे त्यामानाने बोलणं कमीच. घराची आणि समाजाची भाषा वेगळी असल्याने या मुलांच्या इंग्रजीला म्हणजेच त्यांच्या शब्दसंख्येला, पर्यायाने नवीन संकल्पनांना  पाठ्यपुस्तकांच्या मर्यादा येतात. आणि याक्षणी जर मुलाची विचार करण्याची भाषा व अभिव्यक्तीची भाषा यात जर समन्वय साधला गेला नाही तर तो मुलगा इंग्रजी भाषेच्या जाळ्यात कायमचा गुरफटला जातो.

इंग्रजी आणि मराठी माध्यमांच्या शाळातील वाचनालयात 'न वाचनाचा' धोंडा पायावर पडण्याची शक्यता असते. 'मुलांनी जाणीवपूर्वक वाचावं' यासाठी फारतर 5 टक्के शाळांतून प्रयत्न केले जातात, काही उपक्रम राबवले जातात. आत प्रश्न आहे तो 95 टक्के शाळांचा. याठिकाणी 'दात आहेत तर चणे नाहीत व चणे आहेत तर दात नाहीत' अशी अवस्था आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मुलांची मर्यादित शब्दसंख्या व पुस्तकातील परकी संस्कृती व त्यानुसार आलेले संदर्भ यामुळे पुस्तके असूनही 'न वाचनाकडे' कल जातो. मराठी माध्यमाच्या शाळेत 'स्वतंत्र वाचनलय, नवीन पुस्तके, त्यासाठी वेगळा शिक्षक आणि मुलांसाठी वाचनाची तासिका नव्हे तर तास..' ही चैनीची बाब झाली. अनेकानेक मराठी शाळांतील मुले कपाटातील पुस्तकांपर्यंत पोहोचूच शकत नाहीत हे मी स्वत: पाहिलं आहे. वाचनालयात पुस्तके आहेत पण ती मुलांपर्यंत पोहचवण्याची सक्षम यंत्रणा शाळेकडे नाही. शाळा समाजात मिसळली नाही म्हणून समाजाला ती शाळा आपली वाटली नाही, त्यामुळे  ही अडचण निर्माण झाली. यातून मार्ग काढता येईल. शाळेच्या पालकांनी, आजूबाजूला राहणाऱ्या ज्येष्ठ नागरीकांनी किंवा स्वेच्छा निवृत्ती घेतलेल्या नागरिकांनी शाळेच्या वाचनालयाची जवाबदारी घ्यावी.

'न वाचनाचा' तीसरा धोंडा लेखकांच्या आणि प्रकाशकांच्या हाती आहे. याबाबत तुम्हाल एक गोष्ट सांगीतलीच पाहिजे.

दोन वर्षापूर्वी एका बालकुमार दिवाळी अंकाचे संपादक म्हणाले,"आपण मोठ-मोठ्या लेखकांना मुलांसाठी लिहायला सांगूया आणि ते छापूया! काय?" हे ऐकून तर मला धडकीच भरली. मोठ-मोठे लेखक हे जणू काही कंत्राटी लेखक असल्याप्रमाणे त्यांच्याकडे बालसाहित्याची ऑर्डर नोंदवायची आणि त्यांनी वेळेत ऑर्डरबर हुकुम माल पाठवून द्यायचा आणि मग संपादकांनी तो चांगल्या वेष्टनात गुंडाळून मुलांना द्यायचा. हे फारंच भयावह आहे. कारण यात जसं आपण लेखकाला गृहित धरत आहोत तसंच मुलांनाही गृहित धरत आहोत. हे सर्वार्थाने गैर आहे. मी भीत-भीत त्या संपादकांना म्हंटलं,"आधी आपण त्या मोठ-मोठ्या लेखकांना विचारू की ते मुलांसाठी लिहितील का? आणि काय लिहितील? त्यांचे लेखन आपण संपादित करणार आहोत हे ही त्यांना सांगू." हे ऐकल्यावर त्या संपादकांनी तोंड फिरवलं. त्या संपादकांना बालसाहित्य आणि मुलं यांच्याशी काही देणंघेणं नाही. अंक प्रचंड प्रमाणात संपविण्याएव्हढं बळ त्यांच्याकडे आहे आणि हाच त्यांचा सकस बालसाहित्याचा निकष आहे!

'चांगलं लिहिलं तरी प्रकाशक मिळत नाही.' 'प्रकाशक मिळाला तरी व्यवहारात पारदर्शकता नाही.' 'आम्हाला चांगले लेखनंच मिळत नाही.' 'बाल साहित्याला तेव्हढी मागणी नाही.' पुस्तकांच्या बाजारत डोकावल्यावर असं काही ऐकू येतं. पण आपण मूळ मुद्द्याकडे जाऊ.

बालसाहित्य ही गंभीरपणे घेण्याची गोष्ट आहे हे लेखक, कवी, संपादक, चित्रकार आणि  प्रकाशक यांनीही समजून घेतलं पाहिजे. मुलांसाठी लिहिताना जसा त्यांच्या वयोगटाचा विचार करावा लागतो तसाच त्या वयोगटाला साजेशी भाषा, वाक्यरचना आणि त्यांचं भावविश्व यांचा विचार करावा लागतो. लेखन शैलीतील चित्रमयतासुध्दा जशी

वयोगटानुसार बदलत जाते तशीच वयोगटानुसार मुलांसाठी विविध साहित्य प्रकारांची गरज निर्माण होते. हे वयोगट म्हणजे, शिशू गट, किशोर गट व कुमार गट. हे तीन गट म्हणजे मुलांच्या शारीर मानसिक वाढीचे वेगवेगळे टप्पे आहेत. या प्रत्येक टप्प्यावरील मुलांचं भावविश्व वेगळं आहे. यामुळेच मुलांसाठी लिहिणाऱ्याला आपण कुठल्या वयोगटासाठी लिहित आहोत याची जाण असणं गरजेचं आहे.

खरं म्हणजे बालसाहित्याला कुठलाच विषय वर्ज्य नाही. कुठलाही विषय समंजसपणे व कल्पकपणे कसा मांडायचा इथे लेखकाचे कसब आहे. पण वेगवेगळे साहित्य प्रकार मुलांसाठी समर्थपणे हाताळणारे लेखक आज दिसत नाहीत. मुलांना गूढकथा, विज्ञानकथा, विज्ञान कादंबऱ्या, प्रवासवर्णनं, प्राणीकथा, फँटसीकथा असे अनेक प्रकार वाचयला हवे आहेत. काही तरुण प्रकाशक असं वेगळं साहित्य मुलांसाठी प्रकाशित करायला उत्सुक ही आहेत. मग लेखक का लिहित नाहीत?

आज मुलांसाठी लिहिणारी माणसं शोधावी लागतात. बालसाहित्याला ग्लॅमर नाही किंवा त्यात पैसा नाही म्हणून कुणी लिहित नाही हे कारण मला अतिशय तकलादू वाटतं. मला वाटतं,'मूल समजून घेण्याची त्यांना आंस नाही कारण ती माणसं मुलांचं भावविश्व जाणून घेण्यासाठी 'अपग्रेड' झालीच नाहीत.' ही सगळी मोठी माणसं नेहमीच चाळीशीच्या पुढच्यांचा विचार करत आली, त्यांच्यासाठीच लिहित आली, त्यांच्यासाठीच लेखनाच्या आणि वाचनाच्या विविध योजना आणीत गेली. थोडक्यात सांगायचं तर ही मोठी माणसं सतत कापणी करत गेली..पेरणीचा विचार न करता. ह्या मोठ्या माणसांनी जर आपल्या बालपणात डोकावून पाहिलं तर ती नक्कीच यू टर्न घेतील.

काही मोठ्या माणसंचं बालपण हे करपून गेलेलं असतं. त्यामुळे त्याच्यांत दडलेलं मूल हे एकतर चिरचिरं-किरकिरं तरी असतं किवा अपार नॉस्टॅलजिक. अशी माणसं मुलांसाठी नाही लिहू शकत.

किंबहुना कुठलाही मोठा माणूस तो 'मोठा' आहे म्हणून मुलांसाठी नाही लिहू शकत. समोरचं मूल गूण-दोषासकट स्वीकारण्याची तयारी आणि मुलाला उपदेश न करता सर्व पूर्वग्रह बाजूला सारुन मुलाकडून शिकण्याची आंतरिक इच्छा असेल तरंच तो मोठा माणूस लहान मुलात, मूल होऊन मिसळू लागतो. जी माणसं मुलात मिसळू शकतात तीच माणसं मुलांसाठी लिहू शकतात कारण त्यांच्यात लपलेलं मूल फक्त चौकसंच नाही तर खट्याळ ही असतं. थंड हेवच्या ठिकाणी जाऊन आणि बंद खोलीत बसून मुलांसाठी नाही लिहिता येत. मुलांसाठी चांगलं लिहू लागलं तर पैसा आणि तथाकथित ग्लॅमर मागून येतंच. मुलांसाठी चांगलं लिहिणं कठीणंच आहे पण अशक्य मात्र नाही.

यातून मार्ग काढण्यसाठी शाळाशाळांतून वाचकांसाठी व इतरत्र लेखकांसाठी पण 'लेखन कौशल्य कार्यशाळा' व 'वाचन कौशल्य कार्यशाळा' यांचे आयोजन करावे लागेल. विविध लेखकांनी हाताळलेले विविध साहित्य प्रकार, वेगवेगळ्या भाषांतील अनुवादित पुस्तकं मुलांसमोर मांडली गेली पाहिजेत. वाचलेल्या साहीत्यातील आवडलेल्या व न आवडलेल्या गोष्टींबाबत मोकळेपणाने चर्चा व्हायला हवी. चित्रकारांनी सप्रयोग मुलांसमोर 'चित्र आणि मजकूर' यातील नातेसंबंध उलगडून दाखवला पाहिजे. मुलांनी लेखकांशी 'लेखन प्रक्रीया,विषयातील वैविध्य आणि शैली' याबाबत गप्पा मारल्या पाहिजे. वेगवेगळे लेखनप्रकार मुलांनी हाताळून पाहिले पाहिजेत. या कार्यशाळांचं प्रयोजन इतकंच आहे की, मुलांना लेखनातल्या व पुस्तकातल्या गमती-जमती समजाव्यात. लेखन वाचनाबाबत त्यांनी अधिक सजग व्हावं. त्यांनी समजून वाचावं आणि आनंदानं लिहावं, बस्स इतकंच.

लहानपणी वाचलेल्या पुस्तकांचा मुलांच्य मनावर खोलवर परीणाम होत असतो. याबाबतचा एक अनुभव तुम्हाला सांगतो. नगरला बालसाहित्य संमेलन होतं. तिथे मला इयत्ता आठवीतल्या अनुजा मुळेने विचारलं,"मी काय वाचू?" तिला मी तोत्तोचान हे पुस्तक दिलं आणि म्हणालो, मला वाचून कळव. एका आठवड्यातच तिचं मला सुंदर पत्र आलं. तिने लिहिलं होतं,'मला शिक्षिका व्हायचं आहे. मुलांनी मजेत शिकण्यासठी मला मुलांसाठी वेगवेगळे प्रयोग तयार करायचे आहेत.' मी तिला लिहिलं,'कोबायशीं सारखी प्रयोगशील शाळा ग्रामीण भागात काढण्याची माझी पण इच्छा आहे. तू शिक्षिका होशील तेव्हा आमच्या शाळेत ये. आम्हाला चांगली शिक्षिका हवीच आहे.'

या माझ्या पत्राला तिने दिलेले उत्तर थक्क करणारे होते. अनुजाने लिहिलं होतं,'सर मी तुमच्या शाळेत येणार नाही. मी दुसरी शाळा सुरू करेन. यामुळे आपल्या मुलांना दोन चांगल्या शाळा मिळतील.' काही कारणामुळे ती शिक्षिका होऊ शकली नाही आणि मी पण अजून तशी शाळा काढली नाही. कालांतराने मी मुलांसाठी रविवारची गंमतशाळा सुरू केली. आणि मला खात्री आहे अनुजा तिचं शिक्षिका होण्याचं स्वप्नं अजून विसरलेली नाही. संधी मिळताच मुलांसाठी मजेशीर उपक्रमांची ती आखणी करायला लागेल. तोत्तोचान हे खरंच एक जादूई पुस्तक आहे. मुलांनी आणि मुलांसाठी काम करणाऱ्यासर्वांनी हे पुस्तक वाचायलाच हवं. नॅशनल बुक ट्रस्टने ते प्रकाशित केलं आहे.

'न वाचनाचा' आणि एक धोंडा घरात पालकांनीच हात घेतलेला असतो. इतरवेळी साधू संतांच्या गोष्टी करत संस्कार उगाळणारे पालक दिवेलागण झाल्यावर टीव्ही वरच्या पांचट मालिका आवडीने पाहतात. नंतर 'त्याच' विषयांवर तन्मयतेने बोलतात. मग जेवताना 'विनोदी' समजला जाणारा अत्यंत हीन अभीरूची असणारा कार्यक्रम एकत्रितपणे पाहतात. आणि मग भरल्या पोटावरून हात फिरवत ते 'नाच' नावाच्या पॅकींगमधे गुंडाळलेला बिभत्स रिॲलीटी शो चघळतात. तुम्हाला काय वाटतं, अशावेळी त्या घरातली मुलं पुस्तकं वाचत असतात? असे आदर्श घरीच असल्यावर पुढे काय होणार हे सांगायला ज्योतिषाची गरज नाही.

'वाचन संस्कृती' रुजविण्यात शाळांप्रमाणेच पालकांची पण महत्वाची भूमिका आहे. अगदी लहानपणापासून मुलांना पुस्तकांच्या दुकानात घेऊन जाणं, त्यांना पुस्तकं हाताळायला देणं, मुलांसोबत पुस्तकं वाचणं, मुलांना पुस्तक निवडीचं स्वातंत्र्य देणं आणि आपण वाचलेल्या आणि वाचत असलेल्या पुस्तका विषयी मुलांशी आवर्जून बोलणं करावं लागतं. यातूनंच मुले पुस्तकांकडे वळण्याची शक्यता असते.

आपण आपल्या वाचनाविषयी मुलांशी मोकळेपणाने बोलू लागलो, त्यांची मते ऐकून घेऊ लागलो की मुले वाचनाविषयी सजग होतानाच आस्वादक ही होत असतात. पण त्याचवेळी मुलांच्या भावविश्वातल्या, त्यांच्या अंतरंगातल्या अनेक खुब्या आपल्याला उमगत जातात. विंदांच्या बालकविता वाचताना तर मी अनेकवेळा हा थरार अनुभवला आहे. त्यांची 'सर्कसवाला' ही दीर्घकविता तर मास्टरपीस आहे. या कवितेची शैली इतकी चित्रमय आहे की वाचता वाचता आपल्या डोळ्यासमोरुन एक चित्रपटच सरकू लागतो. या कवितेतून विंदांनी मुलांचं भावविश्व अलवारपणे उलगडलं आहे. दोस्ती, प्रेम, असूया, जिव्हाळा आणि असाहयता या भावभावनांचा गोफ या कवितेत असा घट्ट विणला आहे की कवितेचा शेवट जसजसा जवळ येऊ लागतो तेव्हा व्याकूळ होणारी मुले मी पाहिली आहेत.

विंदांच्या बालकविता भन्नाटच आहेत. कारण त्या दोन पातळीवर आहेत. जेव्हा त्या कविता मुलं वाचतात तेव्हा त्या त्यांना त्यांच्याच वाटतात. आणि जेव्हा मोठी माणसं त्या बालकविता वाचतात तेव्हा त्या कविता त्यांना मुलांकडे पाहण्याचा, मूल समजून घेण्याच नवीन दृष्टीकोन देतात. या बालकविता मोठ्या माणसांना अधिक प्रगल्भ करतात.

'अजबखाना' या कविता संग्रहातील एका अगदी लहान कवितेमधली महान गंमत मी आज तुम्हाला सांगणारंच आहे. ही कविता आहेत फक्त 19 शब्दांची. पण या कवितेमधला अर्थ जेव्हा मला उलगडला तेव्हा मी पार बदलून गेलो. या एका बालकवितेसाठी मी विंदांचा आजन्म ऋणी आहे.

या इटुकल्या कवितेचं नाव आहे,'मावशी.' जेव्हा प्रथम मी ही कविता वाचली तेव्हा या कवितेत काही खास आहे असं जाणवलंच नाही. या कवितेतला नाद आणि नातेवाईक आवडत असावेत मुलांना, असंच वाटायचं मला. मुले या कवितेला भरभरून दाद द्यायची. या कवितेत काकू आहे, आत्या आहे व मावशी आहे. कविता वाचल्यानंतर सहज एकदा मुलांना विचारलं,"या कवितेतली तुम्हाला काकू आवडते, आत्या आवडते की मावशी आवडते?" मी हा प्रश्न विचारला तेव्हा समोर किमान हजार मुलं दाटीवाटीने बसलेली होती. प्रश्न ऐकताच सगळी मुले एका सुरात ओरडली, "मावशी..मावशी आवडली आम्हाला."

ही 19 शब्दांची कविता मी पुन्हा पुन्हा वाचली. मुलांसोबत अनुभवली आणि एका क्षणी मला ते कोडं सुटलं. आपण आजपर्यंत काय चूक करत होतो, हे स्वच्छंपणे समजलं. आणि आता या क्षणापासून आपण काय करायला पाहिजे ते लख्खंपणे उलगडलं. ही कविता मला सदैव धीर देते. मला धाकात ठेवते. मूल समजून घेण्याची माझी प्रेरणा सतत तीव्र करत राहाते.

मावशी

सोलापूरहून
येते काकू;
माझ्यासठी
आणते चाकू.

कोल्हापूरहून
येते आते;
माझ्यासाठी
आणते पत्ते.

राजापूरहून
मावशी येते;
माझा एक
पापा घेते!

या कवितेतली काकू मुलासाठी चाकू आणते. या कवितेतली आते मुलासाठी पत्ते आणते. पण या कवितेतली मावशी मुलासाठी काहीच आणत नाही. तरीही सगळ्या मुलांना ही मावशीच आवडते! कारण, मोठ्या माणसांना असं वाटतं की आपण मुलांना काहितरी दिलं तर आपण मुलांना आवडू. मुलांना खाऊ दिला, खेळणी दिली किंवा महाग वस्तू दिल्या तर आपण त्यांना नक्कीच आवडू. पण नाही!

काकू चाकू आणते. आते पत्ते आणते. पण या दोघी जणी मुलाशी बोलत नाहीत. त्याला जवळ घेत नाहीत. मुलाचा आत्मसन्मान जपत नाहित.

मावशी काही आणत नाही तर ती मुलाकडून घेते. मुलाचा मायेने, प्रेमाने पापा घेते. त्याला जवळ घेते. मावशी तिचं प्रेम तिच्या कृतीतून तिच्या स्पर्शातून व्यक्त करते. मुलाचा आत्मसन्मान ऊंचावते. मुले काही केवळ महागड्या वस्तूंची किंवा खाऊची भुकेलेली नसतात. ‘आपणाला एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून किंमत असावी’ इतकीच माफक अपेक्षा मुलांची असते.

आपण मुलांना ‘देणारे’ नव्हे तर मुलांकडून ‘घेणारे’ व्हायला पाहिजे तरच आपण मुलांचे होऊ, असं मला ही कविता सांगत असते. ओळखीच्या किंवा अनोळखी मुलांना भेटल्यावर आपली कृती ही प्रेममयच असली पाहिजे, आपण आधिकाधिक मन मोठं करून समोरच्या मुलाल समजून घेतलं पाहिजे, असं हे विंदांचे 19 शब्द मला सतत बजावत असतात.

मी लहानपणी ज्या नीतिकथा, बोधकथा वाचल्या त्या सर्व गोष्टींच्याखाली ठळक टाइपात त्या-त्या गोष्टीचे तात्पर्य छापलेले असायचे. आणि (छळवादी) मोठी माणसे "गोष्ट वाचली का?'' असं प्रेमाने न विचारता, "काय समजलं गोष्ट वाचून? किंवा अं.. तात्पर्य काय गोष्टीचं?" असं त्रासिक आवाजात विचारत. कालांतराने "ती मोठी माणसं" बालसाहित्य लिहू लागली आणि "तसलेच प्रकाशक" ते छापू लागले. आज तशीच पुस्तकं मुलांच्या हातात पाहताना वाईट वाटतं. गोष्टीखालचे तात्पर्य हे गोष्टीतला आनंद नासवून टाकते हे त्या मोठ्यांना कधी कळेल असं वाटतं. खरं म्हणजे कुठल्याच गोष्टीला केवळ एकंच तात्पर्य नसतं, इतकी साधी गोष्ट का त्यांच्या लक्षात येत नाही? याचं एक कारण असं असु शकेल की,'अनेक मोठ्या माणसांना वाटतं की आता ते मोठे झाले असल्याने त्यांना आता संस्काराची गरज नाही. त्यांची संस्काराची बॅटरी फुल्ल झाली आहे. मुलांचे वय हे संस्कारक्षम असल्याने त्यांची संस्काराची बॅटरी सारखी चार्जींगला लावली पाहीजे. येता-जाता, उठता-बसता सतत संस्काराची फवारणी करायला पाहिजे.' 'बाल संस्कार कथा, संस्कार सीडीज् आणि संस्कार वर्ग असल्या मुलांना पकवणाऱ्या खुळचट कल्पना "तात्पर्य छाप" माणसांच्या डोक्यातूनच निपजल्या आहेत. संस्कार हे करता येत नाहीत किंवा संस्काराची कुठलीही रेसीपी नाही तर संस्कार हे होत असतात आणि ते फक्त मुलांवरंच नाही तर जख्खं म्हाताऱ्या माणसांवरसुध्दा होत असतात, अगदी दगडावरसुध्दा होत असतात हे सत्य जर मोठ्या माणसांनी जाणून घेतलं तर मुले अधिक आनंदी होतील.

सध्या अनेक वर्तमानपत्रांच्या रविवार पुरवणीतून मुलांचे पान गायब होत आहे. आणि ज्या पुरवणीत मुलांचे पान आहे तिथे दर्जेदार बालसाहित्य अभावानेच आढळत आहे. काही पुरवण्यातून तर 'संकलित साहित्य' हे बालसाहित्य म्हणून खपवलं जात आहे. आणि 'बालसाहित्याचि समीक्षा' ही तर फार लांबची गोष्ट झाली.

अत्रेंनी स्वतः पाठ्यपुस्तकांची निर्मीती करुन,संपादन करुन आणि त्यात लिहून ही आजच्या बालसाहित्तिकांपुढे एक वेगळाच आदर्श ठेवला आहे. सई परांजपे यांच्या एकांकिका आणि त्यांचं 'हरवलेल्या खेळण्यांच्या राज्यात' अजूनही तितकंच ताजं आहे. तेंडुलकरांच्या नाटीका आजच्या मुलांना आपल्याच वाटतात. इंदीरा संत, शांताबाई, मंगळवेढेकर, आणि वसंत बापट यांच्या काही बालकविता व जीएंची 'बखर बिम्मंची' कालातीत आहेत. विंदांच्या सर्वच बालकविता इतक्या अफलातून आहेत की पुढील पन्नास वर्ष त्या अढळ स्थानी आहेत. मला इथे एक कल्पना सुचवाविशी वाटते. 'मराठीतले, भारतातल्या इतर भाषांतले व जगातले सर्वश्रेष्ठ बालसाहित्य त्या-त्या वयोगटाचा विचार करून एकत्रिपणे प्रकाशित करायला हवं.' माझ्या प्रमाणेच इतर भाषांत व वेगवेगळ्या देशात काय-काय मजा आहे, हे मुलांना समजायलाच हवं. निवडक बालसाहित्याचा 100 पुस्तकांचा एक संच करायला हवा. किंबहुना जागतिक बालसाहित्याची एक वेबसाईट तयार व्हायला हवी.

"मी का लिहितो? आणि मी मुलांसाठीच का लिहितो?" या दोन प्रश्नांचा हज्जारवेळा विचार केला तरी मला एकंच उत्तर सुचतं. मी का लिहितो याचं उत्तर तर सोपं आहे, मला आवडतं म्हूणून, मला लिहिताना आनंद होतो म्हणून, किंवा लिहिल्याशिवाय मी राहूच शकत नाही म्हणून मी लिहितो. दुसऱ्या प्रश्नाचं उत्तर तर एकदमंच सोपं आहे, मी सतत मुलांचाच विचार करत असतो, मुलांमधे असतो त्यामुळे मी मुलांसाठीच लिहितो.

पहिल्या प्रश्नाला आता एक उपप्रश्न जोडूया, 'मी मुलांसाठी वेगवेगळे फॉर्मस् का लिहितो? म्हणजे मी मुलांसाठी विज्ञान प्रयोग कथा, भय कथा, संवाद कथा, प्रेमळ भुताच्या गोष्टी, गंमत कथा, फँटसी कथा, प्राणी कथा, रुपक कथा, गणित कथा, साहस कथा, पोस्ट कार्ड कथा, बोलक्या गोष्टी, कविता, विविध संकल्पनांवर आधारित (ससोबा-हसोबा, बब्बड, बंटू, आई आणि बाळ, गंमत गँग) कथामालिका, प्रवास वर्णन, पत्रं, कादंबरी, शून्य खर्चाचे विज्ञानाचे सोपे प्रयोग, शून्य खर्चाचे खेळ, एकपात्रिका, द्विपात्रीका, एकांकिका, नाटक असं खूप काही का लिहितो? या प्रश्नासाठी एक मुख्य उत्तर व काही उप-उत्तरे सुचतात. मुलांना विविध फॉर्मस् वाचायला मिळाले पाहिजेत,

वेगवेगळ्या संकल्पनांशी त्यांना खेळायला मिळालं पाहिजे हे निश्चित. आता असं दुसरं कुणी लिहित नसेल तर तक्रार करत बसण्यापेक्षा आपण लिहायला सुरुवात करावी. मुलांना आवडलं तर आपलं लेखन टिकेल नाहीतर जाईल डब्यात!

काहीवेळा मुलांच्या आग्रहाखातर पण लिहावं लागतं. एकपात्रीका स्पर्धा असते तेव्हा मुले नवीन लिहून द्या म्हणून हट्ट करतात अशावेळी त्यांचे लाड करावे लागतात. काही मुलांना स्टेजवर जायचं तर असतं पण एकट्याने स्टेजवर जायला भीती वाटते, अशा मुलांसाठी द्विपात्रीका, त्रिपात्रीका लिहिल्या. पाच-पाच शब्दांची वाक्यं आणि छोटे-छोटे संवाद. मुले बिनधास स्टेजवर जावू लागली.

मी पूर्वी युनिसेफ मधे असताना मला शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यासाठी फिरावं लागे. तेव्हा माझा पहिलीतला मित्र म्हणाल,"माझ्यासाठी रोज एक गोष्ट लिहा ना". त्याला नाही कसं म्हणणार? मी त्याल रोज एक गोष्ट पोस्ट कार्डवर लिहून पाठवत असे.

माझा मित्र चित्रकार गिरीश सहस्रबुध्दे याला मी एकदा विचारलं,"चित्रकाराला काढण्यासाठी कठीण चित्र कोणतं?" क्षणाचाही विलंब न लावता तो म्हणाला,"आई आणि बाळ." याच संकल्पनेवर गोष्टी लिहायचं मी ठरवलं. 'डुकरीण आणि डुकरू, नागीण आणि नागू, पाल आणि पालू, गाढवीण आणि गाढवू' आपापसांत काय बोलत असतील, त्यांच्या भावविश्वात काय गमती-जमती होत असतील आणि माणसांविषयी ते काय विचार करत असतील? अशा अनेक गोष्टी लिहिल्या. मजा आली.

मी शाळेत असताना माझे चार प्रमुख जबरी शत्रू होते. ते मला रोज छळायचे, अतोनात त्रास द्यायचे ते म्हणजे माझे शिक्षक, गणित, विज्ञान व इंग्रजी. (इंग्रजी मधे पाठ्यपुस्तकातील अहमद, गोपाल, सीता व यास्मीन यांनी पण मला दरवर्षी नेमाने पीडलं आहे.) मी शाळेत विज्ञानाचा एकही प्रयोग केला नाही. प्रयोगाच्या वहीत नेहमी खोटंच लिहिलं. " मी एक मेणबत्ती घेतली. ती पेटवली. वगैरे." पण खरंतर हे सगळं शिक्षकांनीच केलेलं असायचं. स्वत: प्रयोग न करताच शिक्षकांनी केलेल्या प्रयोगांचे निष्कर्ष, शिक्षकांनी सांगितल्या प्रमाणे स्वत:चेच म्हणून लिहिले. गणितं वाचताना तर मला फार त्रास व्हायचा. मला खूप प्रश्न पडायचे पण ते कुणाला विचारता ही यायचे नाहीत. गणितातली मोठी माणसं कर्ज काढतात, बुडवतात. मग अशा लबाड माणसांच्या व्याजाचा हिशोब मुलांनी का करायचा? कर्ज काढून व्यवस्थित व्याज भरणारि मोठी माणसं जगात नाहीतंच की काय? मुलांना कुणी कर्ज देत नाही तर मग त्यांनी मदक भागीले 100 असं का करायचं? मोठी माणसं शेत घेणार आणि त्याला कुंपण घालण्यसाठी किती तार लागेल याचा हिशोब मुलांनी का करायचा? तसंच भाषेच्या तासांना आमच्या भावविश्वाशी काडीचाही संबंध नसणाऱ्या विषयांवर आम्ही का बरं निबंध लिहायचे? याविषयी काही प्रश्न मोठ्या माणसांना विचारण्याची हिंमत आम्हा मुलांत नव्हती. 'मोठी माणसे सशक्त असतात व लहान मुले अशक्त असतात' हे सत्य रोजंच आमच्या हातावर, गालावर किंवा पाठीवर उमटत असे. थोडक्यात सांगायचं तर, मी कधीच आनंदाने शाळेत गेल्याचं व सुखासमाधानाने शाळेतून घरी परत आल्याचं मला आठवतंच नाही.

मला वाटलं आपल्या नशीबी जे आलं ते किमान आपल्या मुलांच्य नशीबी नको. म्हणून मग मी माझ्या मुली लहान असताना गंमतशाळा सुरू केली. शनिवार रविवारची गंमतशाळा. माझ्या मुलींसोबत तोत्तोचान आणि दिवस्वप्न ही पुस्तक वाचत असताना "आपण पण गंमतशाळा सुरू करूया" अशी मुलींनी भूणभूण सुरूच केली होती. पण गांधीच्या 'त्या' (पुढे दिलेल्या) गोष्टी नंतर घरातूनच गंमतशाळेला मुलींनी सुरुवात केली. आधी घराची प्रयोगशाळा झाली आणि मग त्यातून गंमतशाळा.

एकदा गांधीजींना भेटायला काही मुले गेली. गांधींनी मुलांना विचारले "तुमचे शिकण्याचे माध्यम काय?" काही मुले म्हणाली,"इंग्रजी" तर काही म्हणाली,"हिंदी".

गांधी म्हणाले,"कमाल आहे. मी तुम्हाला शिकण्याच्या माध्यमाविषयी विचारत आहे आणि तुम्ही तर मला भाषेविषयी सांगत आहात." मुले गोंधळली. तेव्हा मुलांना जवळ घेत गांधी म्हणाले,"अरे गणित, भाषा, विज्ञान असे

कुठलेही विषय शिकण्यासाठी तुम्ही तुमचे हात वापरता का? प्रत्यक्ष अनुभव घेता का? ही शिकण्याची प्रभावी माध्यमं आहेत." आता मुलांना कळलं की इतके दिवस आपण भाषेलाच माध्यम समजत होतो. जे काही शिकायचं ते हाताने. प्रत्यक्ष अनुभव घेऊन. केवळ पाठांतर नव्हे तर स्वत:हून समजून घेऊन. गंमतशाळेचं हेच गाभातत्व आहे.

गंमतशाळेत मुलांना चुका करण्याचं जसं स्वांतंत्र्य आहे तसं चुकातून शिकण्याची संधी ही आहे. मुले त्यांच्या मनातला कुठलाही प्रश्न विचारू शकतात असं निर्भय वातवरण ही आहे. इथे आम्ही मुलांना शिकवत नाही तर शिकण्यासाठी उत्सुक करणं. यासाठी मुलांनी प्रयोग करुन पाहणं, निरीक्षणं करणं, अनुभव घेणं व स्वत:हून शिकणं यावर अधिक भर आहे. गंमतशाळेतील मुलांसाठी भाषा, गणित, विज्ञान, सामान्यज्ञान, भूगोल या विषयांचे सुमारे 100 खेळ व विविध उपक्रम तयार केले. मजेत निबंध लिहिण्याच्या वेगवेगळ्या 10 पध्दती विकसित केल्या. आकलनावर आधारित मजेशीर आणि बहुआयामी स्वाध्याय तयार केले. गंमतशाळेत तिसऱ्या रविवारी समाजातील निरनिराळ्या स्तरातील व्यक्ती मुलांशी गप्पा मारायला येवू लागल्या. गावातले भाजीवाले, डॉक्टर, पोलीस, कचरा वेचणाऱ्या महिला, तृतीयपंथी, नगरसेवीका असे खूपजणं मुलांशी गप्पा मारून गेले. समाजासोबत संवाद साधत त्यातून शिकण्याची पध्दत गंमतशाळेने विकसित केली. डॉक्टरांसोबत गप्पा मारताना मुलांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली, पपई आणि दुधीभोपळ्याला इंजेक्शनस् दिली. खेळता-खेळता मुले नकळत शिकू लागली. यामुळे मुले आनंदाने शाळेत येऊ लागली आणि वेळ संपला तरी शाळेत रेंगाळू लागली. ही आमची गंमतशाळा 8 वर्ष चालली. मी अध्यापनशास्त्राचे औपचारिक शिक्षण न घेतल्याचा मला फायदा झालाच पण गंमतशाळेत मुलांसोबत शिकण्याचा मला अधिक फायदा झाला. 'मुलांच्या आनंददायी शिक्षणाचा ध्यास मनात रुजला आणि बालकेंद्री विचारांचा मार्ग स्वच्छं दिसू लागला.' गरीबातल्या गरीब मुलाला मस्त मजेत शिकता यावं यासाठी शून्य खर्चाचे शैक्षणिक खेळ तयार केले, ते गावातल्या व शहरांतल्य अनेक शाळांतून वापरले, त्यात आवश्यक बदल केले आणि मग ते लिहिले.

विज्ञानाचे शून्य खर्चाचे 89 प्रयोग तयार करुन युनिसेफच्या मदतीने ग्रामीण भागातील शाळाशाळांतून 'शून्य खर्चाच्या प्रयोगशाळा' सुरू केल्या. दर सोमवारी शाळेतल्या सर्व मुलांनी जादू करायची, असं सुरू झाल्यावर शाळेतील मुलांची गळती कमी झाली. मुले स्वत:हून प्रयोग करत एकमेकांच्या मदतीने शिकू लागली. मग हे सारे प्रयोग गोष्टीरुपात लिहिले. गोष्ट वाचता-वाचताच प्रयोग उलगडत जातो आणि प्रयोगा मागचं विज्ञान अलगद उमजत जातं. वाचायच्या आणि करायच्या गोष्टी म्हणजे या विज्ञान प्रयोगकथा. याचप्रकारे इतिहास म्हणजे 'देशाची गोष्ट' आणि भूगोल म्हणजे 'पृथ्वीची गोष्ट' अशी पुस्तकं लिहिली तर मुलांच्या आनंदात भर पडेल. आता कुणालातरी हे काम करावंच लागणार आहे.

विज्ञानाची एक अनामिक भीती आपल्या समाजात आहे. पालकांना वाटतं शिक्षकांनी मुलांना विज्ञान शिकवावं. शिक्षकांना वाटतं पाठ्यपुस्तकात विज्ञान आहेच की, आणखी आपण काय शिकवायचं? खरा घोळ इथेच आहे. विज्ञान नावाची अशी काही खास गोष्ट नाही की जी फक्त पाठ्यपुस्तकात आहे, विज्ञान तर आपल्या सभोवती आहे. दैनंदिन जीवन आणि विज्ञान यांचा सहसंबंध जोडून दाखविणे हे खरे काम आहे.

आमच्य गंमतशाळेतील एक उदाहरण पाहू.

इयत्ता तिसरीच्या विज्ञानाच्या पुस्तकात ज्ञानेंद्रियांची ओळख आहे. त्यात नाकाने वास समजतो व हाताला स्पर्श समजतो असे एक 'बालभारतीय' वाक्य आहे. त्याखाली स्मरणशक्तीवर आधारित रटाळ स्वाध्याय आहे.

यासाठी एका प्रयोगाचं आयोजन केलं. एक सुती रुमाल आणला व त्याचे तीन सारखे तुकडे केले. मग मेणबत्ती पेटवली. एक तुकडा हातात घेऊन मुलांना विचारलं,"हा तुकडा जळायला किती वेळ लागेल?" मुलांनी काहीही उत्तरे दिली. 'एक तास, अर्धा तास, दहा मिनीटं वगैरे.' प्रत्येकाने आपापले अनुमान वहीत लिहून ठेवले. आत्तापर्यंत कापड जाळण्याची मुलांना मुभा नसल्याने, कापड जळण्यासठी किती वेळ लागेल हे मुलांनी सांगणे अपेक्षितंच नव्हते.

तो तुकडा अकरा सेकंदात जळला. मग आम्ही सर्वांनी जळलेल्या कापडाचा वास घेतला. दुसरा तुकडा पाण्यात भिजवला व पिळला. 'आता हा तुकडा जळायला किती वेळ लागेल?' या प्रश्नाला सगळ्या मुलांनी सेकंदात उत्तरे दिली. हा तुकडा जळण्यासाठी वीस सेकंद लागले. या तुकड्याचा वास पहिल्यापेक्षा वेगळा होता.

तिसरा तुकडा तेलात भिजवून मग मेणबत्तीवर धरला. हा तुकडा जळायला बत्तीस सेकंद लागली. कारण आधी तेल जळते मग कापड. हा वास ही वेगळाच होता. मग मुलांनी अशा पदार्थांची यादी केली जे सुके, ओले व तेलात भिजून जळले असता वेगवेगळा वास येतो. त्यानंतर अशा पदार्थांची यादी केली की, पदार्थ एकच पण वेगवेगळ्या स्टेजेसवर त्याचे वेगवेगळे वास येतात. उदा. उतू जाणारं दूध, लागलेलं दूध आणि आटणारं दूध इ. आणि मग डोळे बंद करून ओळखता येणारे वास. तिसरीतल्या मुलांनी सुमारे 182 वासांची यादी तयार केली.

नाकाने आपल्याला फक्त वास समजत नाही तर त्या वासामुळे आपल्याला खूप माहिती समजते आणि तीच खरी महत्वाची असते. अशी विविधप्रकारची माहिती मिळविण्यासाठी वास हे केवळ एक माध्यम आहे आणि त्यासाठी नाक हे एक साधन आहे. पण त्या वासामागे दडलेली माहिती शोधणं हे आपलं खरं साध्य आहे. हे सर्जन शिक्षणामधेही किती उपयुक्त आहे, पण शिक्षण स्वतःच याबाबतीत गोंधळलेलं आहे. शिक्षणात असा मूलभूत विचार केलाच जात नाही. मुलांनी स्वतःहून काही शोधायचं नाही तर पाठ्यपुस्तकातील स्मरणशक्तीवर आधारित रटाळ स्वाध्याय सोडवणं व चाकोरीबध्द लिहिणं म्हणजे शिक्षण असं झालं आहे. या शिक्षणात मुलांना जे वाटतं ते त्यांच्या भाषेत आणि त्यांना हव्या त्या माध्यमातून मांडण्याचं स्वातंत्र्य तर नाहीच पण त्यांच्या जिज्ञासेचा, शोधकवृत्तीचा, आकलनशक्तीचा, सर्जनशीलतेचा कस ही लागत नाही. या सगळ्यांच मुलांच्या संपूर्ण जीवनाशीच नातं असतं, पण हे पालकांना कुणी सांगतंच नाही. आता 'घोका आणि ओका' ही अत्याचारी पध्दत बाद करुन, 'शोधा, समजून घ्या आणि सांगा' ही स्वतःहून शोधण्यास प्रेरित करणारी, समोरच्या गोष्टीतला आशय समजून घेण्यास उत्सुक करणारी आणि सर्जनशीलतेला मुक्त वाव देणारी शिक्षपध्दती आणायला हवी. मुलांसाठी किमान गावागावांतून, वस्तीपातळीवर गंमतशाळा सुरू करण्याचं स्वप्नं मी यासाठीच पाहतो आहे.

आता 'इ-बुक' सुरू झालं आहे. आत्ता तरी किमान 4 टक्के मुलांना इ-बुक वापरता येईल. छपाइचा खर्च नसल्याने पुस्तकाची किंमत ही कमी आहे. सध्या तरी अनेक प्रकाशक आपल्या छापील पुस्तकांचेच इ-बुक मधे रुपांतर करत आहेत. म्हणजेच हातातल्या पडद्यावर दिसणाऱ्या मजकुराला ते इ-बुक म्हणत आहेत. प्राथमिक अवस्थेत हे समजून घेता येईल पण पुढच्या 5 वर्षात तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होईल आणि उपकरणे स्वस्त होतील. पुढील 5 वर्षांचा वेध घेत आत्तापासूनच लेखक व प्रकाशकांना त्यांच्या कार्यशैलीत बदल करावे लागतील. हे बदल दोन पातळ्यांवर असतील, आशय (कंटेण्ट) आणि सादरीकरण (प्रेझेंटेशन). पुढील 5 वर्षात पुस्तकाची व्याख्या ही बदलणार आहे. रुढ अर्थाने वाचण्याची व पाने उलटण्याची पुस्तके असतीलंच पण आता 'इंटरॲक्टीव्ह टच स्क्रीन पुस्तके' येऊ लागली आहेत. त्यानंतर 'सेल्फ मॉनिटरींग व्हर्चूअल इंटरॲक्टीव्ह पुस्तके' येत आहेत. आणि या पुस्तकांची पुढची पिढी म्हणजे 'कस्टमाईज्ड इंटरॲक्टीव्ह एक्सटेंडेड शेअरींग बुक्स' असणार आहे. वेगाने विकसित होणारे तंत्रज्ञान व त्यामूळे निर्माण होणाऱ्या अफाट शक्यता समजून घेऊन सादरीकरणाच्या पध्दतीत तर आमुलाग्र बदल करावा लागणारच आहे पण आशयाची मांडणी ही नवीन तंत्रज्ञानाची कास धरुनंच करावी लागणार आहे. अगदी थोड्याच वर्षात लेखनाच्या साधनात झालेला बदल सुद्धा 4G आहे. फाऊंटन पेन, बॉल पॉईंट पेन, जेल पेन आणि आता की-बोर्ड. एक हाताने लिहिणारे आता दोन हातांनी लिहू लागले आहेत. वाचनाचे साधन ही बदलण्यस सुरुवात झाली आहे. सध्या जरी आपण 2G मधे असलो तरी 3G ची चाहूल लागण्याआधीच जरी 4G अवतरले तरी आश्चर्य वाटायला नको. 4G मधे 'पुस्तक वाचन' ही संकल्पनाच बदलणार आहे. 3D चित्रातून 4G आशय उलगडत जाणार आहे आणि यात अफाट शक्यता अनुस्युत आहेत. त्यातील काही शक्यता अशा आहेत.. मुलाचा आवाज ओळखून पडद्यावरील चित्रे मुलांशी संवाद साधणार आहेत, मुलांच्या स्पर्शाने ती मुलांशी खेळणार आहेत आणि खेळता खेळता

तो मुलगा त्या चित्रांशी म्हणजेच त्याला हव्याअसणाऱ्या व्यक्तीरेखांशी तो एकरुप होणार आहे, त्या चित्रात तोच असणार आहे.. हे आहे कस्टमाईज्ड एक्सटेंडेड शेअरींग. इथून नवीन गोष्ट सुरू होणार आहे 'त्या मुलाच्या' ओळखीच्या माणसांसोबत 'त्यांच्याच' भावविश्वात घडणारी, खरीखुरी 'त्याची' गोष्ट. यानंतर तो मुलगा जे संवाद लिहिल (म्हणजे टाइप करेल) त्यास प्रतिसाद देत गोष्टीतील व्यक्तीरेखा वागू लागतील. गोष्ट पुढे सरकू लागेल. काहीवेळा पात्रांच्या आंतरक्रीयांचा मागोवा घेत संवाद / घटना लिहिव्या लागतील. यानंतर सुरू होईल कस्टमाईज्ड प्रिडिक्शन शेअरींग. यामधे मुलगा लिहू लागला की पुढे काय घडू शकेल याचा अंदाज घेऊन पडद्यावर किमान 4 घटनांचे पर्याय चित्र रुपात समोर येतील. पुढील 55 सेकंदात जर मुलाने निर्णय घेऊन एखादी घटना निवडली नाही किंवा त्या सर्व घटना नाकारुन वेगळी घटना मांडली नाही, तर संगणकाने निवडलेल्या पर्यायाचा स्वीकार करून पुढे जावे लागेल. लिहिणं आणि त्याचं मूल्यांकन हे अटळंच आहे, विकसित होत आहेत त्यांची साधनं आणि त्यांचे विलक्षण पर्याय. 'चाइल्ड फ्रेंडली कस्टमाईज्ड इंटरअॅक्टीव्ह व्हिडिओ' ही तर केवळ वर्षभरातच मुलांच्या हाताशी लागणारी गोष्ट आहे.

संगणकाच्या भाषेत सांगायचं तर आपण मोठी माणसं 'विंडोज 95' मधे आहोत तर मुले 'विंडोज 13' मधे आहेत. बदलायचं आपल्याला आहे. म्हणजे अपग्रेड आपण व्हायचं आहे, मुलांनी नव्हे. 4G तंत्रज्ञान समजून घेण्यास लेखक, पालक किंवा प्रकाशक म्हणून आपण तयार असू तरंच आपल्याला मुलांच्या विश्वात प्रवेश आहे. अन्यथा "आमच्या काळात असं नव्हतं.. तेव्हा किती बरं होतं.." असली भुक्कड रेकॉर्ड (खरंतर सीडी) वाजवत आजन्म 'विंडोज 95'च्या कोशात गुरफटून राहावं लागेल.

"मी सतत कसा काय लिहू शकतो?" असा एक उपप्रश्न मीच मला विचारतो तेव्हा त्याचे अनेक पैलू दिसू लागतात. मी मुलांसठी खूप काही करत असतो. उदा. वेगवेगळ्या विषयांवर किंवा संकल्पनांवर आधारित मुलांच्या कार्यशाळा घेतो. वेगवेगळ्या शाळांत जाऊन मुलांसोबत भाषेचे, गणिताचे खेळ खेळतो किंवा मुलांसोबत विज्ञानाचे धमाल प्रयोग करतो. मोठ्या मुलांशी 'माझी फजिती आणि त्यातून शिकणं' याबाबत मस्त गप्पा मारतो. बालवाडी शिक्षिकांच्या किंवा प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या 'अध्यापन कौशल्य कार्यशाळा' घेतो. पालकांसाठी विविध कार्यक्रम करतो. पण हे सर्व करण्यासाठी मला अनेकांची मदत लागते व अनेक जणांशी जुळवून घेताना सर्वस्वी त्यांच्यावर अवलंबून ही रहावे लागते. पण लिहिण्यासाठी..? लिहिण्यासाठी माझा मी स्वतंत्र असतो. मी कुणावरंच अवलंबून नसतो. म्हणूनच मी अधिकाधिक वेळ लेखनासाठी देतो.

मी मुलांसाठी लिहित असताना माझे आदर्श कोण आहेत? मला रवींद्रनाथ टागोर, गिजुभाई बधेका, तोत्तोचानची लेखीका तेत्सुको कुरोयानागी, स्वामीच्या गोष्टी लिहिणारे आर. के. नारायण. रस्कीन बॉंड, देनीसच्या गोष्टी लिहिणारे व्हिक्टर द्रागुन्सकी, लेखनाच्या शैलीचा विचार केला तर एनीड ब्लायटन आणि विज्ञान प्रसाराला आपलं आयुष्य समर्पित करणारे, मुलात मूल होणारे अरविंद गुप्ता, प्रत्येक उपेक्षित मूल जणू आपलंच आहे असं समजून त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करत त्याच्या शिक्षणाचा ध्यास घेणाऱ्या रेणू गावसकर आणि महाश्वेता देवी असे खूप जणं आहेत. पण या सर्वात मला रवींद्रनाथ श्रेष्ठ वाटतात.

रवींद्रनाथांनी वयाच्या ऐंशीव्या वर्षी बालशिक्षणाचा ध्यास घेतला. बंगाली भाषा शिकण्यास मदत करणाऱ्या 'सहज पाठ' या तीन पुस्तीका लिहिल्या. त्यानंतर लिहिली अंकलिपी. बंगाल मधील प्रत्येक मुलाच्या हे सहज पाठ, तोंडपाठ आहेत ते शासनाने सक्ती केली म्हणून नव्हे तर ते मुलांना आपले वाटतात म्हणून. हे सहज पाठ म्हणजे 'शरीर शिक्षणाचे पण आत्मा म्हणजे गाणी, गोष्टी, कविता, संगीत व गमती-जमती.' मुलांचं नातं हे आत्म्याशी असतं शरीराशी नाही याची रवींद्रनाथांना जाणीव होती. मुले गोष्टी वाचत, गाणी म्हणत, गमती-जमती करत कधी शिकली हे त्यांना कळतंच नसे. " करी मनोरंजनातून शिक्षण जो मुलांचे जडेल नाते प्रभूशी तयाचे" असा त्यांचा दृष्टीकोन होता. माझ्यासाठी ते वंदनीय आहेत.

मुलांनी मजेत शिकावं यासाठी मी प्रयत्न करत असतो. म्हणजे मी नेमकं काय करतो? बालसाहित्यिक म्हणून किंवा मुलांचा लेखक म्हणून 'मला कशाची खंत वाटते? किंवा कुठल्या गोष्टी बाबत मी असमाधानी आहे?'

शिक्षकांना मुलांना शिकवताना कोणत्या अडचणी येतात? कुठले घटक किंवा संबोध समजून घेताना मुलांचा गोंधळ होतो? अभ्यासातला कुठला भाग फारंच किचकट आहे असं वाटतं? हे मी त्यांच्याकडून समजून घेतो व मग तो कठीण भाग सोपा होण्यासाठी त्यांना एखादा नवीन खेळ, उपक्रम किंवा मजेशीर स्वाध्याय सूचवितो. थोडक्यात त्यांच्याच मदतीने त्यातून मार्ग काढतो.

मी मुलांसाठी काम करतो म्हणजेच मी सगळ्या मुलांशी बांधील आहे असं समजतो. पण तरीही मी नॉर्मल मुलांसाठीच काम करतो ही माझी खंत आहे. मला अंध, अपंग, कर्णबधीर, तृतीयपंथी मुले, उपेक्षित आणि गतीमंद मुलांसठी काम करायचं आहे. त्यांचे प्रश्न मला समजून घ्यायचे आहेत. त्यांना शिकताना येणाऱ्या अडचणींतून काही मार्ग काढण्यासाठी मला प्रयत्न करायचे आहेत. आज मला या सर्व मुलांची जाहीर माफी मागायची आहे, दोन कारणासाठी. एक, मी तुमच्यापर्यंत पोहोचण्याचे थोडेफार प्रयत्न केले पण त्यात सातत्य राहिलं नाही. मी कमी पडलो. दोन, माझ्या लेखनातून कधी तुमच्यातले नायक-नायीका आलेच नाहीत, हे आज सांगतान मला लाज वाटते आहे. पण या वर्षात मी तुमच्या पर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीन. तुमच्या सोबत राहीन. आणि यापुढे तुमच्याकडे दूर्लक्ष होणार नाही, असं मी तुम्हाला या मुलांच्या साक्षीने वचन देतो.

मध्यंतरी मी काही महिने सिडनीला गेलो होतो. तिथे काही शाळा पाहिल्या. वर्गात बसलो. खूप नवीन गोष्टी शिकलो. मला इतर देशांतील शाळा ही पाहायच्या आहेत. त्यांच्या शाळांतल्या चांगल्या गोष्टी, शिकण्याच्या नवनवीन पध्दती मला माझ्या देशातल्या मुलांसाठी आणायच्या आहेत. मुलांना निर्भय वातावरणात आनंदाने स्वत:हून शिकता यावं, हेच काम आता करायचं आहे. लवकरंच अशी संधी मला मिळेल याची मला खात्री आहे.

...................................................


- राजीव तांबे.
- rajcopper@gmail.com.
- WEB www.rajivtambe.com
- Cell. 93223 99859.
- Resi. 0251 2454343